सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७**

# महाराष्ट्र जातीय, समाजविरोधी व इतर विघातक कृत्यांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९८०

(दिनांक ३० जून १९८५ पर्यंत सुधारलेला)

**Maharashtra Act No. VII of 1981**

# The Maharashtra Prevention of Communal, Anti-Social and other Dangerous Activities Act, 1980

*(As modified upto 30th June 1985)*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[किंमत : रु. ४-००]

# सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७

## महाराष्ट्र जातीय, समाजविरोधी व इतर विघातक कृत्यांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९८०

(दिनांक ३० जून १९८५ पर्यंत सुधारलेला)

### अनुक्रमणिका

उद्देशिका
कलमे
पृष्ठे


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व प्रयुक्ती. | १ |
| २ | व्याख्या. | १ |
| ३ | विवक्षित व्यक्तींना स्थानबद्ध करण्यासंबंधीचे आदेश काढण्याचा अधिकार. | २ |
| ४ | स्थानबद्धता आदेशाची अंमलबजावणी. | ३ |
| ५ | स्थानबद्धतेचे ठिकाण व शर्तीयांचे विनियमन करण्याचे अधिकार. | ३ |
| ६ | विवक्षित कारणांमुळे स्थानबद्धता आदेश विधिअग्राह्य किंवा अप्रवर्तनशील न होणे. | ३ |
| ७ | फरारी व्यक्तींच्या संबंधातील अधिकार. | ३ |
| ८ | स्थानबद्धता आदेशाची कारणे त्या आदेशाचा परिणाम झालेल्या व्यक्तींना उघड करून सांगणे. | ४ |
| ९ | सल्लागार मंडळाची स्थापना. | ४ |
| १० | सल्लागार मंडळाकडे विचारार्थ पाठविणे. | ४ |
| ११ | सल्लागार मंडळाची कार्यपद्धती. | ४ |
| १२ | सल्लागार मंडळाच्या अहवालावर कार्यवाही. | ४ |
| १३ | स्थानबद्धतेचा कमाल कालावधी. | ५ |
| १४ | स्थानबद्धता आदेश रद्द करणे. | ५ |
| १५ | स्थानबद्ध व्यक्तींची तात्पुरती सुटका. | ५ |
| १६ | अधिनियमान्वये केलेल्या कारवाईचे संरक्षण. | ५ |
| १७ | सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ५६ ची सुधारणा. | ५ |
| १८ | सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १५१ ची सुधारणा. | ६ |
| १९ | सन १९८० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ चे निरसन व व्यावृत्ती. | ६ |


(शा.म.मु.) उच ४२११- (६०६७-११-२००६)

## सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७[1]

[महाराष्ट्र जातीय, समाजविरोधी व इतर विघातक कृत्यांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम.]

[राष्ट्रपती यांची अनुमति मिळाल्यानंतर महाराष्ट्र राजपत्र, भाग चार मध्ये दिनांक २३ जानेवारी १९८१ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

**महाराष्ट्रात जातीय, समाजविरोधी व इतर विघातक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी व त्यांच्याशी संबंधित बाबींची तरतूद करण्यासाठी अधिनियम**

**ज्याअर्थी**, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी**, महाराष्ट्र राज्यात जातीय, समाजविरोधी व इतर विघातक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी व त्यांच्याशी संबंधित बाबींची तरतूद करण्यासाठी एक कायदा करण्याकरिता राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे ज्यामुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल, महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती ; आणि म्हणून त्यांनी महाराष्ट्र जातीय, समाजविरोधी व इतर धोकादायक कृत्यांना प्रतिबंध करण्याबाबत अध्यादेश, १९८० हा दिनांक २७ ऑगस्ट १९८० रोजी प्रख्यापित केला होता ; (१९८० चा महा. अध्या. ७)

**आणि ज्याअर्थी**, भारताच्या राष्ट्रपतींनी प्रख्यापित केलेला आणि दिनांक २३ सप्टेंबर १९८० रोजी अंमलात आलेला राष्ट्रीय सुरक्षा अध्यादेश, १९८०, यामधील विवक्षित तत्सम तरतुदीदाखलचे फेरबदल करून, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— (१९४० चा अध्या. ११.)

संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व प्रयुक्ती.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जातीय, समाजविरोधी व इतर विघातक कृत्यांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९८० असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) तो दिनांक २७ ऑगस्ट १९८० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(४) या अधिनियमाची कलमे २ ते १६ ही, दिनांक २३ सप्टेंबर, १९८० चा राष्ट्रीय सुरक्षा अध्यादेश, १९८० याच्या प्रारंभापासून, लागू होतील, आणि ती, या अधिनियमान्वये २३ सप्टेंबर १९८० पूर्वी काढलेल्या किंवा काढले असल्याचे मानण्यात येणाऱ्या स्थानबद्धता आदेशानांच फक्त लागू असल्याचे मानण्यात येईल. (१९८० चा अध्या. ११)

व्याख्या

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यास बाध येईल अशा कोणत्याही प्रकारे वर्तन करणे " म्हणजे— (१९८० चा अध्या. अकरा)

(एक) कोणत्याही व्यक्तीचा किंवा व्यक्तींच्या वर्गाचा धर्म, वंश, जात, समाज किंवा भाषा या कारणांवरून शत्रुत्वाची, द्वेषाची किंवा बेबनावाची भावना निर्माण होईल अशा प्रकारे प्रचार करणे, अशी भावना वाढवण्याचा किंवा निर्माण करण्याचा प्रयत्न करणे किंवा अन्य प्रकारे तशीकृती करणे.

(दोन) (दारूगोळा, हत्यारे व स्फोटक द्रव्ये, ज्वालाग्राही किंवा दाहक पदार्थ धरून) कोणत्याही प्राणहारक शस्त्रांच्या वापराची तयारी करणे, त्यांचा वापर करण्याचा प्रयत्न करणे, त्यांचा वापर करणे, त्यांच्या वापरास चिथावणी देणे, तसे करण्यास उद्युक्त करणे किंवा तसे करण्यास अपप्रेरणा देणे यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेत अडथळा येत असेल किंवा अडथळा येण्याचा संभव असेल, त्या

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता महाराष्ट्र शासन राजपत्र, १९८०, भाग पाच, पृष्ठ ३२८ (इंग्रजी) पहा.

बाबतीत तशा शस्त्रांचा वापर करण्यासाठी तयारी करणे किंवा तसा वापर करण्याचा प्रयत्न करणे, तसा वापर करणे, किंवा तसा वापर करण्यास चिथावणी देणे, उद्युक्त करणे किंवा अन्य प्रकारे तसे करण्यास अपप्रेरणा देणे ;

(तीन) भारतीय दंड संहितेच्या कलम ४२५ च्या अर्थानुसार, सार्वजनिक मालमत्ता किंवा सार्वजनिक वाहतुकीची साधने यांच्या बाबतीत, जेथे आगळीक केल्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेत अडथळा येत असेल किंवा अडथळा येण्याचा संभव असेल तेथे अशी आगळीक करण्याचा प्रयत्न करणे किंवा आगळीक करणे किंवा आगळिकीस चिथावणी देणे, उद्युक्त करणे किंवा अन्य प्रकारे अशी आगळीक करण्यास अपप्रेरणा देणे ; १८६० चा ४५.

(चार) मृत्यूदंडाच्या किंवा जन्मठेपेच्या किंवा सात वर्षे किंवा अधिक मुदतीच्या कैदेच्या शिक्षेस पात्र असणारे अपराध केल्याने जेथे सार्वजनिक सुव्यवस्थेस अडथळा येत असेल किंवा अडथळा येण्याचा संभव असेल तेथे असा अपराध करणे.

**स्पष्टीकरण.**—या खंडामध्ये,—

(अ) "अग्निशस्त्रे" याला शस्त्र अधिनियम, १९५९, मध्ये नेमून दिलेलाच अर्थ असेल ; १९५९ चा ५४.

(ब) "स्फोटक पदार्थ" याला स्फोटक पदार्थ अधिनियम, १९०८, मध्ये नेमून दिलेलाच अर्थ असेल ; १९०८ चा ६.

(क) "सार्वजनिक मालमत्ता" म्हणजे शासनाच्या मालकीची किंवा शासनाच्या नियंत्रणा खाली असलेली किंवा शासनाच्या मालकीच्या किंवा शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या महामंडळाची किंवा ज्या संस्थेला शासनाने संपूर्ण किंवा बऱ्याच प्रमाणात वित्त सहाय्य दिलेले असेल, त्या संस्थेच्या मालकीची किंवा तिच्या नियंत्रणाखाली असलेली कोणतीही मालमत्ता ;

(ब) "स्थानबद्धता आदेश" म्हणजे कलम, ३ अन्वये काढलेला आदेश ;

(क) "स्थानबद्ध" म्हणजे, स्थानबद्धता आदेशाखाली स्थानबद्ध केलेली व्यक्ती.

विवक्षित व्यक्तींना स्थानबद्ध करण्या-संबंधीचे आदेश काढण्याचा अधिकार.

३. (१) सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यास बाधक ठरेल अशा कोणत्याही रीतीने वागण्यास कोणत्याही व्यक्तीला प्रतिबंध करणे आवश्यक आहे याबद्दल राज्य शासनाची खात्री झाल्यास, राज्य शासनाला, अशा व्यक्तीस स्थानबद्ध करण्याचा निदेश देणारा आदेश काढता येईल.

(२) पुढीलपैकी कोणत्याही अधिकाऱ्यांस म्हणजे—

(अ) जिल्हा दंडाधिकारी,

(ब) राज्य शासनाने या बाबतीत खास अधिकार दिलेले अपर जिल्हा दंडाधिकारी,

(क) पोलीस आयुक्त.

यास, यात, पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्याची खात्री झाल्यास, उक्त पोट-कलमान्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करता येईल.

(३) पोट-कलम (२) मध्ये नमूद केलेला एखादा अधिकारी जेव्हा या कलमान्वये कोणताही आदेश काढील तेव्हा त्याने ताबडतोब, राज्य शासनाला उक्त वस्तुस्थिती कळविली पाहिजे आणि त्यासोबत, ज्या कारणास्तव तो आदेश काढण्यात आला असेल ती कारणे व त्या अधिकाऱ्याच्या मते ज्याचा प्रस्तुत प्रकरणाशी संबंध पोचत असेल असा इतर तपशीलही कळविला पाहिजे आणि असा कोणताही आदेश, शासनाने दरम्यानच्या काळात त्याला मान्यता दिली नसेल तर, तो काढण्यात आल्यापासून बारा दिवसांपेक्षा अधिक काळ अंमलात राहणार नाही.

१९७४ चा २ ४. स्थानबद्धता आदेशाची अंमलबजावणी, राज्यातील कोणत्याही ठिकाणी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये अटक-अधिपत्राची अंमलबजावणी करण्यासाठी तरतूद केलेल्या रीतीनेच करता येईल. स्थानबद्धता आदेशाची अंमलबजावणी.

५. ज्या व्यक्तीच्या संबंधात स्थानबद्धता आदेश काढण्यात आला आहे अशी प्रत्येक व्यक्ती ही,— स्थानबद्धतेचे ठिकाण व शर्ती यांचे विनियमन करण्याचे अधिकार.

(अ) राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा ठिकाणी व अशा शर्तींनुसार—यात देखभाल, शिस्त आणि शिस्तभंगाबाबत शिक्षा यांबिषयीच्या शर्तींचा, अंतर्भाव आहे—स्थानबद्ध केली जाण्यास पात्र असेल ; आणि

(ब) राज्य शासनाच्या आदेशानुसार, राज्यातील स्थानबद्धतेच्या एका ठिकाणाहून स्थानबद्धतेच्या अन्य ठिकाणी पाठवली जाण्यास पात्र असेल.

६. कोणताही स्थानबद्धता आदेश हा,— विवक्षित कारणांमुळे स्थानबद्धता आदेश विधिअग्राह्य किंवा अप्रवर्तनशील न होणे.

(अ) त्या आदेशान्वये स्थानबद्ध करावयाची व्यक्ती त्या राज्यात असली तरी आदेश काढणाऱ्या अधिकाऱ्याच्या प्रादेशिक अधिकारतेच्या हद्दीबाहेरील आहे, किंवा

(ब) अशा व्यक्तीला स्थानबद्ध करावयाचे ठिकाण राज्यात असले तरी, उक्त हद्दीच्या बाहेर आहे ; याच केवळ कारणास्तव विधिअग्राह्य किंवा अप्रवर्तनशील होणार नाही.

७. (१) जिच्या संबंधात स्थानबद्धता आदेश, [illegible] आला आहे ती व्यक्ती फरारी झाली आहे किंवा आदेशाची अंमलबजावणी होऊ नये म्हणून स्वतः लपून बसली आहे, असे जर राज्य शासनाला किंवा, यथास्थिति, कलम ३, पोट-कलम (२) मध्ये नमूद केलेल्या एखाद्या अधिकाऱ्याला असे सकारण वाटले तर राज्य शासनास किंवा त्या अधिकाऱ्यास :— फरारी व्यक्तींच्या संबंधातील अधिकार.

१९७४ चा २ (अ) उक्त व्यक्ती, सर्वसाधारणत: ज्या ठिकाणी रहात असेल त्या ठिकाणी अधिकारिता असलेल्या महानगर दंडाधिकाऱ्याला किंवा पहिल्या वर्गाच्या न्याय दंडाधिकाऱ्याला ती वस्तुस्थिती लेखी कळविता येईल ; आणि त्यानंतर त्या व्यक्तीस स्थानबद्ध करण्यात यावे असे सांगणारा तो आदेश जणू काही त्या दंडाधिकाऱ्याने काढलेले अधिपत्र असल्याप्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ची कलमे ८२ ते ८६ (दोन्ही धरून) यांच्या तरतुदी अशा व्यक्तीच्या व तिच्या मालमत्तेच्या संबंधात लागू होतील ;

(ब) शासकीय राजपत्रात अधिसूचित केलेल्या आदेशाद्वारे उक्त व्यक्तीस, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्यासमोर, अशा ठिकाणी व अशा कालावधीच्या आत, हजर राहण्याचा निदेश देता येईल ; आणि उक्त व्यक्तीने अशा निदेशाचे पालन करण्यात कसूर केली तर, त्या व्यक्तीने, त्या निदेशाचे पालन करणे आपल्याला शक्य नव्हते हे, आणि ज्या कारणास्तव त्या निदेशाचे पालन करणे शक्य नव्हते ते कारण आणि आपला ठावठिकाणा आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत याणि नमूद केलेल्या अधिकाऱ्याला आपण कळवला होता, हे सिद्ध केलेले नसेल तर, किंवा अशा प्रकारे कळविणे तिला शक्य नव्हते हे सिद्ध केलेले नसेल तर त्या व्यक्तीस अपराधसिद्धीनंतर एक वर्षापर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कैदेची किंवा दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

१९७४ चा २ (२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (१) खंड (१) खालील प्रत्येक अपराध दखलपात्र असेल.

स्थानबद्धता आदेशाची कारणे त्या आदेशाचा परिणाम झालेल्या व्यक्तींना उघड करून सांगणे.

८. (१) स्थानबद्धता आदेशानुसार एखाद्या व्यक्तीला स्थानबद्ध करण्यात येईल तेव्हा तो आदेश काढणाऱ्या प्राधिकाऱ्याने, शक्य तेवढ्या लवकर, परंतु त्या व्यक्तीस स्थानबद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून पाच दिवसांच्या आत, ज्या कारणास्तव तो आदेश काढण्यात आला असेल ती कारणे त्या व्यक्तीला कळविली पाहिजेत आणि त्या आदेशाविरुद्ध राज्य शासनाकडे अभिवेदन करण्याची लवकरात लवकरची संधी तिला दिली पाहिजे.

(२) जी वस्तुस्थिती उघड करणे हे सार्वजनिक हिताला बाधक आहे असे प्राधिकाऱ्याचे मत असेल ती वस्तुस्थिती उघड करणे पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे आवश्यक असणार नाही.

सल्लागार मंडळाची स्थापना.

९. (१) राज्य शासनाने, ज्या ज्यावेळी आवश्यक असेल त्या त्यावेळी या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी एक वा अनेक सल्लागार मंडळे स्थापन केली पाहिजेत.

(२) अशा प्रत्येक मंडळामध्ये जे उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आहेत किंवा होते किंवा भारताच्या संविधानान्वये उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नेमले जाण्यास जे पात्र आहेत अशा एका अध्यक्षाचा व दोन अन्य सदस्यांचा समावेश असेल.

सल्लागार मंडळाकडे विचारार्थ पाठविणे.

१०. या अधिनियमान्वये स्थानबद्धता आदेश काढला असेल अशा प्रत्येक प्रकरणी, राज्य शासन, त्या आदेशानुसार एखाद्या व्यक्तीस स्थानबद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, राज्य शासनाने स्वत: कलम ९ अन्वये स्थापन केलेल्या सल्लागार मंडळापुढे, ज्या कारणास्तव आदेश काढण्यात आला ती कारणे आणि त्या आदेशामुळे परिणाम झालेल्या व्यक्तीने कोणतेही अभिवेदन केले असल्यास ते अभिवेदन ठेवले पाहिजे आणि तो आदेश जर एखाद्या अधिकाऱ्याने काढलेला असेल तर अशा अधिकाऱ्याने कलम ३, पोट-कलम (३) अन्वये दिलेला अहवालही ठेवला पाहिजे.

सल्लागार मंडळाची कार्यपद्धती.

११. (१) सल्लागार मंडळाने त्याच्यासमोर ठेवण्यात आलेले साहित्य विचारात घेऊन आणि त्याला आवश्यक वाटेल अशी आणखी माहिती राज्य शासनाकडून किंवा राज्य शासनामार्फत त्या प्रयोजनार्थ बोलावण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून किंवा संबंधित व्यक्तीकडून मागवल्यानंतर आणि एखाद्या विशिष्ट प्रकरणी सल्लागार मंडळाला जर तसे करणे आवश्यक वाटले तर अथवा संबंधित व्यक्तीची, आपले म्हणणे ऐकून घ्यावे अशी इच्छा असली तर, तिचे म्हणणे स्वत: ऐकून घेतल्यानंतर आपला अहवाल, संबंधित व्यक्तीला स्थानबद्ध केल्याच्या तारखेपासून सात आठवड्यांच्या आत राज्य शासनाकडे सादर केला पाहिजे

(२) सल्लागार मंडळाच्या अहवालात संबंधित व्यक्तीला स्थानबद्ध करण्यास पुरेसे कारण आहे किंवा नाही याबाबतचे सल्लागार मंडळाचे मत स्वतंत्र भागात नमूद केले पाहिजे.

(३) जेव्हा सल्लागार मंडळाच्या सदस्यांमध्ये मतभिन्नता असेल तेव्हा, अशा सदस्यांपैकी बहुसंख्य सदस्यांचे मत हे त्या मंडळाचे मत असल्याचे मानण्यात येईल.

(४) सल्लागार मंडळाची कार्यपद्धती त्याचप्रमाणे अहवालाच्या ज्या भागात सल्लागार मंडळाचे मत नमूद केलेले असेल तेवढा भाग वगळता बाकी सर्व अहवाल, गोपनीय असेल.

(५) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, जिच्याविरुद्ध स्थानबद्धता आदेश काढण्यात आला असेल अशा कोणत्याही व्यक्तीला, सल्लागार मंडळाकडे विचारार्थ पाठवलेल्या विषयांशी संबंधित अशा, कोणत्याही बाबतीत कोणत्याही विधिव्यवसायीमार्फत आपली बाजू मांडण्याचा हक्क प्राप्त होणार नाही.

सल्लागार मंडळाच्या अहवालावर कार्यवाही.

१२. (१) ज्या बाबतीत सल्लागार मंडळाने आपल्या अहवालात, एखाद्या व्यक्तीला स्थानबद्ध करण्यासाठी पुरेसे कारण असल्याचे आपले मत नमूद केलेले असेल अशा कोणत्याही प्रकरणी राज्य शासनास तो स्थानबद्धता आदेश कायम करता येईल आणि त्यास योग्य वाटेल तेवढ्या कालावधीकरिता, संबंधित व्यक्तीची स्थानबद्धता चालू ठेवता येईल.

(२) ज्या बाबतीत सल्लागार मंडळाने, संबंधित व्यक्तीस स्थानबद्ध करण्यास पुरेसे कारण नसल्याचे आपले मत अहवालात नमूद केलेले असेल अशा कोणत्याही प्रकरणी राज्य शासनाने स्थानबद्धता आदेश रद्द केला पाहिजे आणि त्या व्यक्तीस ताबडतोब सोडून देण्याची व्यवस्था केली पाहिजे.

१३. कलम १२ अन्वये कायम करण्यात आलेला असेल अशा या अधिनियमाखाली काढलेल्या कोणत्याही स्थानबद्धतेचा स्थानबद्धता आदेशानुसार कोणत्याही व्यक्तीला ज्या कमाल कालावधीकरता स्थानबद्ध करता येईल तो कमाल कालावधी स्थानबद्धतेच्या तारखेपासून सहा महिन्यांइतका असेल. कमाल कालावधी.

१९०४ चा मुंबई चा २१ १४. (१) स्थानबद्धता आदेश हा, तो कलम ३ च्या पोट-कलम (२) मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्याने काढलेला असला तरी, मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याच्या कलम २१ च्या तरतुदींना बाध न आणता राज्य शासनाला, कोणत्याही वेळी रद्द करता येईल किंवा त्यात फेरफार करता येईल. स्थानबद्धता आदेश रद्द करणे.

(२) स्थानबद्धता आदेश रद्द झाल्याच्या किंवा समाप्त झाल्याच्या तारखेनंतर असा आदेश काढण्यात यावा याविषयी यथास्थिती राज्य शासनाची किंवा एखाद्या अधिकाऱ्याची खात्री होईल अशी कोणतीही नवीन वस्तुस्थिती उद्‌भवली असेल अशा कोणत्याही बाबतीत स्थानबद्धता आदेश रद्द होण्यामुळे किंवा तो समाप्त होण्यामुळे, त्याच व्यक्तीविरुद्ध कलम ३ अन्वये नवीन स्थानबद्धता आदेश काढण्यास प्रतिबंध होणार नाही.

१५. (१) राज्य शासनाला कोणत्याही वेळी असा निदेश देता येईल की, स्थानबद्धता आदेशानुसार स्थानबद्ध केलेल्या कोणत्याही व्यक्तीची एक तर विनाशर्त किंवा त्या व्यक्तीने मान्य केलेल्या असतील अशा, त्या निदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शर्तींवर, कोणत्याही विनिर्दिष्ट कालावधीसाठी, सुटका करता येईल आणि त्यास कोणत्याही वेळी तिची सुटका रद्द करता येईल. स्थानबद्ध व्यक्तींची तात्पुरती सुटका.

(२) कलम (१) अन्वये कोणत्याही स्थानबद्ध व्यक्तीच्या सुटकेबाबत निदेश देताना, राज्य शासनाला, निदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शर्तींचे यथोचित पालन व्हावे यासाठी जामीनदारांसह किंवा जामिनदारांशिवाय, बंधपत्र करून देण्यास तिला फर्माविता येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये सुटका केलेली कोणतीही व्यक्ती, तिच्या सुटकेबाबत निदेश देणाऱ्या किंवा यथास्थिती तिची सुटका रद्द करणाऱ्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आले असेल अशा वेळी व अशा ठिकाणी आणि अशा प्राधिकाऱ्याच्या स्वाधीन होईल.

(४) कोणत्याही व्यक्तीने, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रीतीने स्वाधीन होण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर केली तर, अपराधसिद्धीनंतर तिला दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कैदेची किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(५) पोट-कलम (१) अन्वये सुटका करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीने, त्या पोट-कलमान्वये तिच्यावर लादलेल्या किंवा तिने करून दिलेल्या बंधपत्रातील कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात कसूर केली तर, ते बंधपत्र, जप्त झाल्याचे जाहीर करण्यात येईल आणि त्याद्वारे बद्ध झालेली कोणतीही व्यक्ती, त्याबाबतची शास्ती देण्यास पात्र ठरेल.

१६. या अधिनियमानुसार सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी राज्य शासनाविरुद्ध किंवा कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही. अधिनियमान्वये केलेल्या कारवाईचे संरक्षण.

१७. (मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ याच्या कलम ५६ मध्ये सुधारणा अंतर्भूत करण्यात आली आहे.) सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ५६ ची सुधारणा.

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ यांच्या कलम १५१ ची सुधारणा.

१८. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ही महाराष्ट्र राज्यास लागू असताना, तिच्या कलम १५१ मध्ये,— १९७४ चा २.

(अ) पोट-कलम (२) मध्ये " केले जाणार नाही,—मात्र " या मजकुरानंतर " पोटकलम (३) खाली किंवा " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

(ब) पोट-कलम (२) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(३) (अ) या कलमाखाली अटक केलेल्या व्यक्तीला,—

(एक) तिची सुटका केल्यानंतर, ती व्यक्ती, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला दखली अपराध करण्याचे डाव रचणे चालू ठेवण्याची शक्यता आहे किंवा तो अपराध करण्याची शक्यता आहे ; आणि

(दोन) प्रकरणाची परिस्थिती अशी आहे की, ती मोकळी राहणे हे सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यास बाधक ठरण्याची शक्यता आहे ;

या कारणासाठी अटक केलेल्या व्यक्तीला, अटकेच्या वेळेपासून चोवीस तासांपेक्षा अधिक कालावधी-साठी (अटक केलेल्या व्यक्तीला अटकेच्या ठिकाणापासून न्याय दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयात नेण्यासाठी आवश्यक असलेला कालावधी वगळून) स्थानबद्धतेत ठेवणे आवश्यक आहे असे मानण्यास, अटक करणाऱ्या अधिकाऱ्याला किंवा अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला ज्याच्यासमोर हजर करण्यात आले असेल अशा पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला, वाजवी आधार असेल तर, अटक करणाऱ्या अधिकाऱ्याने किंवा पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकाऱ्याने, अशा अटक केलेल्या व्यक्तीला, चोवीस तासांपेक्षा जास्त कालावधीसाठी स्थानबद्धतेत ठेवण्यासंबंधीची कारणे नमूद करणाऱ्या लेखी अहवाला-सह, सर्वात जवळच्या न्याय दंडाधिकाऱ्यासमोर हजर केले पाहिजे.

(ब) या संहितेमध्ये किंवा त्यावेळी अंमलात असणाऱ्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशा अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला ज्याच्यासमोर हजर करण्यात आले असेल अशा दंडाधिकाऱ्याने अशा व्यक्तीला चोवीस तासांपेक्षा अधिक काळासाठी तात्पुरत्या स्थानबद्धतेसाठी अभिरक्षेत ठेवण्यासाठी वाजवी आधार आहे याबाबत समाधान झाले असेल अशा बाबतीत, त्यास वेळो-वेळी, आदेशाद्वारे त्याला योग्य वाटेल अशा अभिरक्षेत पाठविता येईल :

परंतु, कोणत्याही व्यक्तीला, या कलमाखाली एका वेळी, पंधरा दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी आणि अशा व्यक्तीच्या अटकेच्या तारखेपासून तीस दिवसांपेक्षा अधिक होईल अशा एकूण कालावधी-साठी स्थानबद्ध करण्यात येणार नाही.

(क) एखाद्या व्यक्तीला खंड (ब) खाली अभिरक्षेत परत पाठविण्यात आले असेल अशा बाबतीत दंडा-धिकाऱ्याने, शक्य तितक्या लवकर, ज्या कारणावरून तो आदेश काढण्यात आला आहे ती कारणे त्याला कळविली पाहिजेत आणि अशा व्यक्तीला, त्या आदेशाविरुद्ध, सत्र न्यायालयाकडे अभिवेदन देता येईल. असे अभिवेदन मिळाल्यावर, सत्र न्यायाधीशाला, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, एकतर ते अभिवेदन फेटाळता येईल किंवा अटक केलेल्या व्यक्तीला आणखी स्थानबद्धतेत ठेवणे आवश्यक नाही असे त्याला वाटले तर किंवा अन्यथा तसे करणे योग्य व न्याय्य वाटले तर, त्यास आदेश विलोपित करता येईल आणि त्यानंतर अटक केलेल्या व्यक्तीला तात्काळ मुक्त करण्यात येईल."

सन १९८० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ चे निरसन व व्यावृत्ती.

१९. (१) महाराष्ट्र जातीय, समाजविरोधी व इतर विघातक कृत्यांना प्रतिबंध करण्याबाबत अध्यादेश, १९८० हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९८० चा महा. अध्या. ७.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे केलेली कोणतीही गोष्ट किंवा कृती (काढलेल्या कोणत्याही आदेशासह) ही या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींनुसार यथास्थिती, करण्यात किंवा काढण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई